23 FEB 2022 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# न्यू कॉलेजमध्ये शुक्रवारपासून मराठी शिक्षक संघाचे अधिवेशन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस संचलित न्यू कॉलेज व शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २५ व २६ रोजी न्यू कॉलेज ऑडिटोरियम येथे आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्र (१९९० नंतरची मराठी कादंबरी) व 'शिविम'चे अकरावे वार्षिक अधिवेशन आयोजित केले आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ.व्ही.एम. पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

चर्चासत्राचे उद्घाटन शुक्रवार दि.२५ रोजी सकाळी १० वाजता संस्थेचे चेअरमन के. जी. पाटील यांच्या हस्ते व कुलगुरू डॉ. डी.टी.शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. अनिल गवळी असणार आहेत.

यावेळी स्पर्धांचे पारितोषिक वितरण, गुणवंत विद्यार्थी सत्कार, ललित, ललितेतर गुणवंत शिक्षक पुरस्कार, सेवानिवृत्त प्राध्यापकांचे सत्कार केले जाणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

23 FEB 2022
तरुण भारत

# भारतीय कंपनी सचिव संस्थानबरोबर विद्यापीठाचा सामंजस्य करार

## कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, आयसीएसआयचे पवन चांडक यांच्या स्वाक्षरी

प्रतिनिधी
कोल्हापूर

भारतीय कंपनी सचिव संस्थान (आयसीएसआय, नवी दिल्ली) यांच्याबरोबर शिवाजी विद्यापीठाने सामंजस्य करार केला आहे. हा करार अत्यंत दिशादर्शक असा मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास संस्थेच्या पश्चिम विभाग चेअरमन राजेश तरपरा यांनी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठ आणि नवी दिल्ली येथील भारतीय कंपनी सचिव संस्थान यांच्या दरम्यान सहकार्यवृद्धीच्या अनुषंगाने सामंजस्य करार झाला.



**कोल्हापूर : सामंजस्य कराराचे हस्तांतर करताना डॉ. व्ही. एन. शिंदे, पवन चांडक. सोबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. केदार मारुलकर, डॉ. एस. एस. महाजन.**

अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि आयसीएसआयकडून पवन चांडक यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या आहेत.

संस्थेच्या पश्चिम विभागीय प्रादेशिक मंडळाचे सदस्य पवन चांडक म्हणाले, १६ आयआयएम संस्थांसह विविध विद्यापीठांशी संस्थेने ७५ सामंजस्य करार केले आहेत. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या समावेश आहे.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, कंपनी सचिव या क्षेत्रातील संधींविषयी अद्याप शहरी भागाखेरीजचे बहुसंख्य विद्यार्थी अनभिज्ञ आहेत. ग्रामीण, डोंगरी, दुष्काळी आदी दुर्गम भागांतील विद्यार्थ्यांना कंपनी सचिव क्षेत्रातील करिअर संधींची माहिती देण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण, जागृती उपक्रम राबविण्याची गरज आहे. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, चेअरमन ऐश्वर्या तोरस्कर, ज्योतिबा गावडे, अधिष्ठाता डॉ. एस.एस. महाजन, डॉ. केदार मारुलकर, उपस्थित होते.

**असा आहे सामंजस्य करार**

संयुक्त संशोधन प्रकल्प, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय परिषदा, कार्यशाळा, प्रशिक्षण कार्यक्रम, परिसंवादांचे आयोजन करता येणार. परस्परांच्या तज्ज्ञांच्या पॅनलमध्ये शिक्षणतज्ज्ञ, शिक्षक, प्रशिक्षक तसेच सीएस व्यावसायिक यांना संधी मिळणार. आयसीएसआयची दोनशेहून अधिक पुस्तके विद्यार्थ्यांसाठी मोफत उपलब्ध करून देणार.

तरुण भारत

# 'मराठी कादंबरी' विषयावर २५,२६ रोजी चर्चासत्र

- न्यू कॉलेज आणि शिवाजी विद्यापीठ मराठा शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन
- कुलगुरु डॉ.डी.टी.शिर्के प्रमुख पाहुणे

प्रतिनिधी
कोल्हापूर

श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस संचलित न्यू कॉलेज आणि शिवाजी विद्यापीठ मराठा शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसाचे आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्र व शिविमचे ११ वे वार्षिक अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. न्यू कॉलेजमध्ये २५ आणि २६ फेब्रुवारी होणाऱ्या या चर्चासत्रात १९९० नंतरची मराठी कादंबरी हा विषय आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील म्हणाले, चर्चासत्रासाठी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे चेअरमन के.जी. पाटील यांच्या हस्ते उदघाटन होणार आहे.

शिविमचे ११ वे अध्यक्ष प्रा. डॉ. अनिल गवळी हे अध्यक्षस्थानी असणार आहेत. यावेळी नितीन रिंढे, डॉ. रंगनाथ पठारे, प्रवीण बांदेकर, सोनाली नवांगुळ, किरण गुरव, डॉ.रघुनाथ केंगार, डॉ. दत्ता पाटील, डॉ. रणधीर शिंदे यांची उपस्थिती असणार आहे.